# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२७/०४/२०१९
## दि.२६/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३६२/१९,भादविक ५११,४५७,४२७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२७ वर्षे,रा.माळवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०४/१९ रोजी ०६/०० वा ते दि.२६/०४/१९ रोजी सकाळी ०९/३० वा.चे दरम्यान महादेवनगर मांजरी येथील अजित मल्टीस्टेट को.ऑप.क्रेडीट सोसा.लिमी. बँक |
| **तपशिल** | यातील महादेवनगर मांजरी येथील अजित मल्टीस्टेट को.ऑप.क्रेडीट सोसा.लिमी. बँक या बँकेचे शटर लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,चोरी करण्याच्या उद्देशाने सदरची बँकेचे शटर उचकटले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. गाडे ८८८८८७९९६९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २१२/१९,भादविक १७०,४०६,४१९,४२० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२ वर्षे,रा.२१८७,न्यु मोदीखाना,कॅम्प,पुणे |
| **आरोपी** | एक इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०३/२०१९ रोजी ते दि.२६/०४/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे राहते घरी व गुलटेकडी,मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद एक इसम व महिला यांनी संगतमत करुन,फिर्यादी यांना दुचाकी सवलतीत पोलीस कोटयातुन मिळवुन देतो असे खोटे सांगुन,सदर इसमाने आपण स्वतः पोलीस असल्याचे सांगुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचेकडुन ५५,७५०/- रुपये वेळोवेळी एनईएफटीद्वारे ट्रान्सफर करून घेऊन,फिर्यादीस दुचाकी किंवा त्याचे पैसे परत न देता, फिर्यादी यांनी दिलेले पैसे स्वतःचे फायदयासाठी वापरुन,त्यांची नमुद रकमेची फसवणुक करुन विश्वासघात केला आहे. (सदरचा गुन्हा तक्रारी अर्जावरुन दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.जी.गज्जेवार ८१४९५९१६४६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३३९/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-१८,रा.मानाजीनगर,न-हे,पुणे |
| **आरोपी** | दोन मोबाईलधारक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/१२/२०१८ रोजी १८/०० वा.ते दि.३१/१२/२०१८ रोजी १७/०० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी ऑनलाईन मोबाईल खरेदी विक्री करणा-या ओएलएक्स या साईटवर आयफोन या मोबाईल फोन विक्रीची जाहिरात पाहुन,यातील नमुद इसम मोबाईलधारक यांचेशी संपर्क करुन,फिर्यादी यांचे पेटीएमव्दारे एकुणे ४७,९९४/- रुपये ट्रान्सफर करुन देखील,सदर इसमांनी फिर्यादी यांना मोबाईल फोन किंवा त्यांचे पैसे यातील काहीही न देता,फिर्यादी यांची फसवणुक केलेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) क्रांतीकुमार पाटील ९९२३०७११०० |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** चंदननगर पो स्टे १८०/१९,भादविक ४०६,४०८,४१९,४२०,४६८,४७१

**फिर्यादी** एक इसम,वय-४५ वर्षे,रा.गोंधळेनगर,हडपसर,पुणे

**आरोपी** अभिषेक सुरेंद्र गोयल,वय-३६ वर्षे,रा.वानवडी बाजार,वानवडी,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** माहे नोव्हेंबर २०१७ ते नोव्हेंबर २०१८ रोजीचे कालावधीत नामांकीत ग्रुपचे खराडी येथील स.नं.२२/२,याठिकाणी सुरु असलेल्या आर्केडीया या बांधकाम प्रोजेक्टवर

**तपशिल** यातील फिर्यादी हे नामांकीत बांधकाम प्रोजेक्ट ग्रुप या कंपनीत साईट सुपरवायझर या पदावर काम करत असुन,नमुद इसम अभिषेक गोयल हा सदर कंपनीत कन्स्ट्रक्शन कंपनीचे आर्केडीया या बांधकाम प्रोजेक्टवर प्रोजेक्ट सेल्स हेड म्हणुन काम करीत असताना,त्याने नमुद कालावधी मध्ये बांधकाम प्रोजेक्टवर आलेल्या ग्राहकांना तो कंपनीचे संचालकांचा चुलत भाऊ असल्याचे खोटे सांगुन,ग्राहकांचा विश्वास संपादन करुन,तुम्ही रोख रक्कम देवुन ताबडतोब बुकींग केल्यास फ्लॅटचे खरेदी किंमतीत तुम्हाला सुट देऊ असे आमिष दाखवुन, असे सुमारे ०८ ग्राहकांकडुन एकुण ०६,५०,०००/- रुपये रोख रक्कम स्वरुपात घेऊन, त्याबद्दल त्यांना खोटया पावत्या व कंपनीचे नावे बनावट अलॉटमेंट लेटर देऊन,सदर रक्कम कंपनीचे अकाऊंट मध्ये न भरता,सदर रकमेचा परस्पर अपहार करुन,फिर्यादी यांचे कंपनीची तसेच ग्राहकांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. ए.एस.देशमुख ८६६८५५६१००

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** विश्रामबाग पो स्टे १६९/१९,भादविक ३७९

**फिर्यादी** दुंडप्पा चौगुले,वय-६३,रा.डांगे चौक,पुणे

**आरोपी** अज्ञात व्यक्ती (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२६/०४/२०१९ रोजी ११/१५ वा.ते १२/१५ वा.चे दरम्यान पी.एम.एम.पी.एल. बस मधुन डांगे चौक ते गणपती मंदिर प्रवासा दरम्यान

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांची मेव्हणी हिचेसह पी.एम.एम.पी.एल. बस मधुन डांगे चौक ते गणपती मंदिर असा प्रवास करीत असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,त्यांची नजर चुकवुन, मेव्हणी यांचे खांद्याला अडकवलेली पर्स त्यामधील सोन्याचे मंगळसुत्र,दोन चांदीचे बांगडया व रोख रक्कम १३,५००/- रुपये असा एकुण ९८,५२०/- रु किचा ऐवज ग्रे रंगाची पर्ससह चोरुन नेली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. व्हि.व्हि.जाधव ९८५०९७५९२०

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** चतुःश्रृंगी पो स्टे ४३२/१९,भादविक ३८०

**फिर्यादी** एक महिला,वय-३० वर्षे,रा.सेनापती बापट रोड,पुणे

**आरोपी** अज्ञात व्यक्ती (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२६/०४/२०१९ रोजी सकाळी ०६/४५ ते ०७/३० वा.चे दरम्यान गोखलेनगर येथील स्विमिंग पुल येथील महीलांचे चेजींग रुम मधुन

**तपशिल** यातील फिर्यादी ह्या स्विमिंग शिकण्यासाठी गोखलेनगर येथील स्विमिंग पुल येथे गेल्या असताना, कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,फिर्यादी यांनी चेंजींग रुम मधील सामान ठेवण्याचे कपाटात त्यांनी ठेवलेल्या पर्स मधुन सोन्याचे मनी मंगळसुत्र ४५,०००/- रू किचे चोरुन नेले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. आर.एस.सरडे ९९२३४०६४७६

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**